# महाराष्ट्र शासन
## गृह विभाग

**शासन ज्ञापन क्रमांक : दुरुस्ती-०३१८/प्र.क्र.१४७/पोल-७.**

मंत्रालय, दुसरा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०००३२.

दिनांक : १० मे २०१८.

**विषय** :- चेंबूर पोलीस ठाणे याच्या अंतर्गत पोलीस सेवा निवासस्थानांमधील विद्युतविषयक दुरुस्तीची विवक्षित कामे करण्यासाठी प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

**संदर्भ** :-
1) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. विअप्र-२०१४/ प्र.क्र.४९/ १४/ विनियम, दिनांक ०५.०१.२०१५.
2) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. विअप्र-२०१३/ प्र.क्र.३०/ १३/ विनियम, भाग-२, दिनांक १७.०४.२०१५.
3) पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, यांच्या कार्यालयाचे पत्र क्र. पोआ/कक्ष-८(१३)/ शा.३८/ १८, दिनांक १४.०२.२०१८.

**ज्ञापन.-**

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, यांनी चेंबूर पोलीस ठाणे याच्या अंतर्गत पोलीस सेवा निवासस्थानांमधील विद्युतविषयक दुरुस्तीची पुढील कामे करण्यासाठी प्रशासकीय मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव सादर केला आहे:-

| अ.क्र. (१) | कामाचे नाव (२) | खर्चाचे अंदाज (३) |
|---|---|---|
| १. | *“Providing renovation to electrical installation in 1 HK Police Constable quarters and street lights -- 80 Police quarters (‘A’ and ‘B’ wing) at Basant Park, Chembur (East), Mumbai.”* | रु.५,३४,५६४/- |
| २. | *“Providing renovation to electrical installation in 1 HK Police Constable quarters and street -- 32 Police quarters (‘A’ and ‘B’ wing) at Basant Park, Chembur (East), Mumbai.”* | रु.३,११,३२०/- |
| ३. | *“Providing renovation to electrical installation in 1 BHK Police quarters and street lights -- 10 PSI quarters at Basant Park, Chembur (East), Mumbai.”* | रु.२,२५,७४७/- |
| **एकूण** | | **रु.१०,७१,६३१/-** |

**२.** उक्त खर्चाचे अंदाज हे उप अभियंता, मुलुंड विद्युत (सार्वजनिक बांधकाम) उपविभाग, यांनी सन २०१७-१८ च्या दरसूचीनुसार तयार केले असून ते कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई विद्युत (सार्वजनिक बांधकाम) विभाग, यांनी साक्षांकित केले आहेत.

**३.** उक्त खर्चाचे अंदाज हे सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, यांनी तपासले असून ते पुढीलप्रमाणे सुधारित केले आहेत आणि प्रशासकीय मान्यता देण्यास, विवक्षित अटींवर, सहमती दिली आहे:-

| अ.क्र. (१) | कामाचे नाव (२) | खर्चाचे अंदाज (३) |
|---|---|---|
| १. | *"Providing renovation to electrical installation in 1 HK Police Constable quarters and street lights -- 80 Police quarters ('A' and 'B' wing) at Basant Park, Chembur (East), Mumbai."* | रु.५,७५,६८४/- |
| २. | *"Providing renovation to electrical installation in 1 HK Police Constable quarters and street -- 32 Police quarters ('A' and 'B' wing) at Basant Park, Chembur (East), Mumbai."* | रु.३,३५,२६८/- |
| ३. | *"Providing renovation to electrical installation in 1 BHK Police quarters and street lights -- 10 PSI quarters at Basant Park, Chembur (East), Mumbai."* | रु.२,३३,७६२/- |
| **एकूण** | | **रु.११,४४,७१४/-** |

**४.** त्या अनुसार, चेंबूर पोलीस ठाणे याच्या अंतर्गत पोलीस सेवा निवासस्थानांमधील विद्युतविषयक दुरुस्तीची परिच्छेद **३** मधील तक्त्यात उल्लेख केलेली कामे करण्यासाठी एकूण **रु.११,४४,७१४/-** इतक्या खर्चाच्या अंदाजास, पुढील अटींवर, याद्वारे, प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे:-

१) निधी उपलब्ध झाल्याशिवाय कामास सुरुवात करु नये;

२) खर्चाचे अंदाज हे पोलीस सह आयुक्त (प्रशासन), बृहन्मुंबई, यांनी साक्षांकित करावे.

**५.** उक्त कामासाठी येणारा खर्च हा गृह विभाग-मागणी क्रमांक बी-१, २०५५, पोलीस, (०२) शहर पोलीस, (०२)(०१) शहर पोलीस-आस्थापना (दत्तमत) (अनिवार्य) (२०५५ ००९७), २७, लहान बांधकामे, याखाली उपलब्ध असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

**६.** हे ज्ञापन सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.१७२/ इमा-२, दिनांक ०२.०४.२०१८, अन्वये मिळालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

**७.** हे ज्ञापन महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा सांकेतांक २०१८०५१०१८१९३५७८२९ असा आहे. हे ज्ञापन डीजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Swapnil Gopal Borse

Digitally signed by Swapnil Gopal Borse
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=66835707253ff77ef0e333eb3ad582f9b876d443b2654088832e43dcad21c52a, cn=Swapnil Gopal Borse
Date: 2018.05.10 18:18:34 +05'30'

**( स्वप्नील गोपाल बोरसे )**

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

**प्रति,**

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई.

**प्रत :-**

१) कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई विद्युत (सार्वजनिक बांधकाम) विभाग, *(सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, यांनी सुधारलेल्या "Abstract" च्या प्रतीसह).*

२) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
३) निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई.
४) प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई.
५) कार्यासन अधिकारी (इमा-२), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई.
६) कार्यासन अधिकारी, वित्त विभाग (व्यय-७), मंत्रालय, मुंबई.
७) निवड फाईल (पोल-७).